# अंबेडे–नगरगाव (गोवा) घराणे

अंबेडे हे गाव गोवा प्रांतात सत्तरी (वाळपई) ह्या तालुक्याचे शहरापासून ४ कि. मी. अंतरावर असून म्हापसा या प्रमुख व्यापारी शहरापासून ४३ कि. मी. व पणजीपासून ५५ कि. मी. वर आहे. येथे नियमीत बस सेवा उपलब्ध आहे. या गावाचे पोस्ट ऑफिस नगरगाव येथे आहे. शांतादुर्गाचे मंदिर असून गावाची लोकसंख्या ३००–४०० एवढीच आहे. त्या ठिकाणी अभ्यंकरांचे एकच घर असून त्यांचे पूर्वज अंदाजे ४०० वर्षापूर्वी तिथे आले, व शेतीवाडी करून राहिले. शिवाय भिक्षुकी हा त्यांचा प्रमुख व्यवसाय होता. अभ्यंकरांप्रमाणेच वझे, गाडगीळ, बर्वे, मराठे, भावे, जोशी, छत्रे इत्यादि चित्पावन ब्राह्मणांची घरे आहेत. बागायती जमिनीत पोफळीची व नारळाची झाडे प्रमुख. शिवाय वरकस जमिनीत काजूची लागवड केली आहे.

पूर्वीचे रत्नागिरी जिल्ह्यातील नारिंग्रे किंवा अन्य ठिकाणाहून हे आले असावेत. पण निश्चित ठिकाण सांगता येत नाही. या कुटुंबातील चुलत बंधू बेळगांव–शहापूर येथे वस्ती करून आहेत, असे अनंत गोविंद अभ्यंकर कळवितात. अनंत गोविंद अभ्यंकर यांना ४।५ पिढ्यांपूर्वीची माहिती नाही. जी माहिती त्यांच्या कडून मिळाली ती पुढे दिली आहे.

वरील ठिकाणाशिवाय गोवा प्रांतात कोलवाल ता. बारदेस, म्हापसा– खोर्ली व पाळी–कोठंबी ता. सत्तरी या ठिकाणी तीन अभ्यंकर कुटुंबे आहेत. परंतु त्यांचे मूळगाव आरोस, ता. सावंतवाडी असल्यामुळे त्यांची माहिती आरोस घराण्यांत दिली आहे.

१/१ **अनंत**–हे मूळपुरुष रत्नागिरी जिल्ह्यातून प्रथम गोव्यात अंबेडे, ता. सत्तरी, गोवा येथे आले. परंतु रत्नागिरी जिल्ह्यातील गावाचे नाव ठाऊक नाही. परंतु ते इ.स. १८०० चे सुमारास आले असावेत.

२/२ **विष्णु अनंत**–शिक्षण–मराठी २ री.
व्यवसाय–शेती, बागायती, व भिक्षुकी.
वास्तव्य–आंबेडे, ता. सत्तरी, गोवा.

३/३ **रामकृष्ण विष्णु**–शिक्षण–वैदिकी.
व्यवसाय–भिक्षुकी. वास्तव्य–प्रथम आंबेडे, गोवा, नंतर इचलकरंजी व सांगली येथे.
भार्या : **भीमा**–माहेर–दामले. नानोडा, ता. डिचोली, गोवा.
कन्या :
१) **गंगू**–सासर–थोरात, सांगली.
२) **यमू**–सासर–भिडे, सांगली.

४/४ **विष्णु रामकृष्ण**–जन्म १९०० इचलकरंजी.
शिक्षण–वैदिकी. व्यवसाय–भिक्षुकी. वास्तव्य–प्रथम इचलकरंजी व नंतर सांगली.
भार्या : दोन. पण नांवे व पत्ते माहीत झाले नाहीत.
अपत्य नाही.

५/४ **लक्ष्मण रामकृष्ण**–जन्म इचलकरंजी.
शिक्षण–वैदिकी. व्यवसाय–भिक्षुकी.
वास्तव्य–औरंगाबाद.

६/४ **दत्तात्रय रामकृष्ण**–जन्म इचलकरंजी.
शिक्षण–मराठी ७ वी पास. व्यवसाय– दत्तात्रय कुलकर्णी (सांगली) यांच्या हॉटेलमध्ये मॅनेजर म्हणून काम करीत होते. वास्तव्य– सांगली.
भार्या : नाव माहीत झाले नाही. माहेर–देवगड तालुक्यातील. बाकी माहिती नाही.

७/४ **गणपती रामकृष्ण**–जन्म इचलकरंजी.
वास्तव्य–खानापूर ता. सांगली.

८/४ **श्रीपाद रामकृष्ण**–जन्म सांगली.
शिक्षण–एस्.एस्.सी. व्यवसाय–व्हेटर्नरी असिस्टंट, सांगली. वास्तव्य–सांगली.

९/२ **आत्माराम अनंत**–वास्तव्य–आंबेडे ता. सत्तरी, गोवा.

१०/३ **अनंत आत्माराम**–जन्म आंबेडे गोवा.
शिक्षण–वैदिक. व्यवसाय–शेती बागायती व भिक्षुकी.
वास्तव्य–आंबेडे–गोवा नंतर शेवटी शहापूर–बेळगाव.
भार्या : दोन १) माहेर–धावे, सत्तरी येथील रामचंद्र जोशी यांची भगिनी.
२) माहिती नाही. पुत्र अपत्य नाही.

११/३ **श्रीकृष्ण आत्माराम**–जन्म आंबेडे–गोवा.
शिक्षण–वैदिकी. व्यवसाय–शेती–बागायती.

# अंबेडे–नगरगांव (गोवा) घराणे




वास्तव्य—अंबेडे. ता. सत्तरी, गोवा.
भार्या : **राधा**—माहेर—परांजपे, नानोडे—बांबर, गोवा येथे.
१२/४ **आत्माराम कृष्ण**—जन्म आंबेडे गोवा इ.स. १८९३. शिक्षण—वैदिकी. व्यवसाय— भिक्षुकी. वास्तव्य—प्रथम अंबेडे—गोवा व नंतर शहापूर बेळगांव.
भार्या : १) नाव माहीत नाही. माहेर—महादेव जोशी, धावे—गोवा. यांची कन्या. २) नाव माहीत नाही—शहापूर बेळगाव येथील.
१३/५ **कृष्ण आत्माराम**—जन्म शहापूर बेळगांव. शिक्षण—मराठी ७ वी. व्यवसाय— भिक्षुकी. वास्तव्य—शहापूर—बेळगांव.
भार्या : **राधा**—माहेर—दुर्गा गोविंद बेहेरे, कवळे, ता. फोंडा, गोवा.
१४/६ **आत्माराम (शरद्) कृष्ण**—जन्म शहापूर, बेळगांव येथे. शिक्षण—बी.कॉम्. व्यवसाय—बँक ऑफ महाराष्ट्र, चिपळूण येथे मॅनेजर. वास्तव्य—सध्या चिपळूण येथे व प्रमुख निवास शहापूर, बेळगांव.
भार्या : **अश्विनी**—माहेर—जोशी—सोलापूर.
कन्या : **मनिषा**—८ वर्षांची असून शिकत आहे.
१५/६ **लक्ष्मण (प्रमोद) कृष्ण**—जन्म १९६० शहापूर, बेळगांव येथे. शिक्षण—बी.कॉम्. व्यवसाय—एल्.आय.सी. मध्ये नोकरी. वास्तव्य—कचेरी गल्ली, शहापूर, बेळगांव.
भार्या : **मेघना**—माहेर—हुबळी.
कन्या :
१) **मीनल**—वय ५ वर्षे.

२) **लक्ष्मी**–वय ६ महिने.
१६/६ **गजानन कृष्ण**–जन्म-शहापूर, बेळगांव. शिक्षण–इंजिनिअर. व्यवसाय– इंजिनिअरची नोकरी. वास्तव्य–मुंबई. अविवाहित.
१७/४ **गोविंद कृष्ण**–जन्म इ.स. १९००. मृत्यू १९६० आंबेडे येथे. शिक्षण–क्रमांत वैदिक. व्यवसाय–भिक्षुकी. वास्तव्य–आंबेडें, गोवा.
भार्या : **अन्नपूर्णा**–माहेर–मनू रामकृष्ण जोशी. हेमाड बारसे–गवाणे, सत्तरी, गोवा.
कन्या :
१ ) **शांता**–सासर-जोशी, पती–भालचंद्र जोशी. मोर्ले, साखळी, गोवा.
२) **यमुना**–सासर–सरस्वती श्रीधर जोशी. वास्तव्य–बांबर, सत्तरी, गोवा.
१८/५ **अनंत गोविंद**–जन्म १६ ।८ ।१९३२ आंबेडे येथे. स्वातंत्र्य सैनिक. १५ ।८ ।१९७२ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधीकडून ताम्रपट मिळाला. गोवा व केंद्र सरकारकडून पेन्शनही मिळते. इ. स. १९५५ ते जुलै १९५९ पर्यंत जवळजवळ साडेचार वर्षे तुरूंगात होते. शिक्षण–मराठी ५ वी व वैदिक शाखा पूर्ण. व्यवसाय–भिक्षुकी व शेती बागायती. वास्तव्य–अंबेडे, ता. सत्तरी, गोवा. विवाह १२ ।३ ।१९ ६०
भार्या : **सत्यभामा**–माहेर–कुमुदिनी वामन फडके. मये, ता. डिचोली, गोवा.
कन्या :
१) **लता**–जन्म ९ ।९ ।१९६१. नॉनमॅट्रिक. डिचोली, गोवा येथे वास्तव्य. सासर–लता वल्लभ फडके. रा. मूळगाव. ता. डिचोली, गोवा.
२) **गीता**–जन्म २२ ।६ ।१९६८. शिक्षण–एस. वाय. बी.ए. सासर–गीता प्रकाश गाडगीळ. वाळपई, गोवा.
१९/६ **गोविंद (संजू) अनंत**–जन्म ७ ।७ ।१९६३. शिक्षण–७ वी पास व वैदिकी. व्यवसाय– भिक्षुकी करतो. वास्तव्य–आंबेडे, गोवा.
भार्या : **अन्नपूर्णा**–माहेर–पुष्पा भास्कर पाटणकर. मळेवाड ता. सावंतवाडी
२०/६ **राजेंद्र अनंत**–जन्म २ ।१० ।१९६६ अंबेडे. शिक्षण–एस्.एस्.सी. व्यवसाय–पोष्ट खात्यात पोस्टमनची नोकरी. सोनाल, सावर्डे, गोवा. वास्तव्य–आंबेडे.
२१/५ **त्रिंबक गोविंद**–जन्म १९३९. मृत्यू १९७३. अविवाहित.